# सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय

**नवीन शासकीय तंत्रनिकेतन परिसर, सामनगांव रोड नाशिक-रोड ,नाशिक**

☎ : 2461479, Fax : 2455301 ई-मेल:-ronashik.dte@gmail.com.

Website :-www.dtensk.org


जा.क्र.तंशि/विकाना/तांशा/ 1863 दिनांक :- 27 अक्टूबर OCT 2010

**प्रति,**

प्राचार्य/संचालक,
विनाअनुदानित अभ्यासक्रमाच्या
पदविका,पदवी,व पदव्युत्तर पदवी
अभियांत्रिकी/फार्मसी/एचएमसीटी/
वास्तुशास्त्र/एमबीए/एमसीए,अभ्यासक्रमाच्या पदविका,पदवी व पदव्युत्तर पदवी संस्था,
नाशिक विभाग.

**विषय :-** शैक्षणिक वर्ष २०१०-११ मधील आर्थिकदृष्टया मागासवर्गीय विदयार्थ्याच्या शैक्षणिक शुल्काची ५० टक्के प्रतिपूर्ती करण्याबाबत...

**संदर्भ:-** १. शासननिर्णय ,उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्र.टिईएम/२००६/(४९६/०७) तांशि-१ दिं.१० डिंसेबर २००७.

२.संचालनालयाचे पत्र कं.१५/अर्थसं/आ.शै.प्र./२०१०-११/२८४ दिं.१९.१०.२०१०

उपरोक्त विषयास अनुसरुन संदर्भाधीन शासननिर्णय क्र.१ नुसार आपल्या संस्थेत शैक्षणिक वर्ष २०१०-११ मध्ये केंद्रीभूत प्रवेशप्रक्रियेद्वारे प्रवेश घेतलेल्या आर्थिकदृष्टया मागासवर्गीय विदयार्थ्याच्या शैक्षणिक शुल्काची ५० टक्के प्रतिपूर्ती करण्यासाठी जी कार्यपध्दती विहीत करण्यात आलेली आहे. त्यानुसार सोबत जोडलेल्या विवरणपत्रातील माहिती तसेच सदरच्या माहितीच्या आधारे संस्थानिहाय निधीच्या मागणीची परिगणना करुन संस्थानिहाय मागणीचा निधी संचालनालयास सादर करावयाचा आहे.

त्या अनुषंगाने आपणास सुचित करण्यात येते कि सोबतच्या विवरणपत्रातील माहिती खालील नमूद करण्यात आलेल्या कागदपत्रासह संबधित काम करणा-या कर्मचा-यासोबत **दिं.२०.११.२०१० पूर्वी या कार्यालयास हस्तदेय सादर करावी.**

१) संस्थेने विदयार्थ्याचे या पत्रासोबतच्या संचालनालयाने पाठविलेल्या मार्गदर्शक सूचनाची नोंद घेवून सोबतच्या विहीत नमुन्यात अर्ज व संबधित कागदपत्रे.

२).विदयार्थ्याच्या पालकांचा आर्थिकवर्ष सन २००९-१० या वर्षातील उत्पन्नाचा रु.१,००,०००/- आतील **तहसिलदाराचा उत्पन्नाचा दाखला.**

**३.तलाठी,संरपंच,ग्रामसेवक,सरकारी/निमसरकारी कर्मचारी यांचे पगारदाखले,तसेच फॉर्म नं.१६ वरील उत्पन्न ग्राहय धरले जाणार नाही याची नोंद ध्यावी.फक्त तहसिलदाराने निर्गमित केलेले रु. १,००,०००/- आतील उत्पन्न दाखले अर्जासोबत असणे आवश्यक आहे.तसेच इतर संबधित कागदपत्रे उदा.गुणपत्रिका,रेशनकार्ड, रहिवाशी,अपत्य दाखला, इ. कागदपत्राच्या सांक्षाकित छांयाकित प्रत जोडणे आवश्यक आहे.**

**४.पदविका,पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमामधील पात्र व खुला सवर्गातील विदयार्थ्याकरिताच ही सवलत देय राहील.व सदर अभ्यासकमातील केंद्रीभूत प्रवेशपकिया (CAP) मधून आलेले विदयार्थीच पात्र राहतील. संस्थास्तरावरील कोणतेही प्रवेशातील विदयार्थी (Against Cap,Instiute Level) सदर सवलतीसाठी पात्र राहणार नाही तसेच सदर ईबीसी सवलत ही एम.फार्म,एम.ई.,एम.टेक या अभ्यासक्रमामधील विदयार्थ्याना लागू नाही यांची नोद घ्यावी.**

५).विदयार्थ्याचे सोबतच्या विहीत नमुन्यातील अर्ज सर्व संबधित कागदपत्रासह दोन प्रतीत भरुन घेणे आवश्यक आहे.या कार्यालयामध्ये फक्त एकच प्रत प्रस्तावासोबत प्रत्येक विदयार्थ्याची पाठवावी व एकप्रत आपल्या कार्यालयात ठेवावी.संचालनालयाचे तपासणी पथक आल्यानंतर सर्व विदयार्थ्याचे अर्ज व वाटप केलेल्या रक्कमा इ.दाखविणे संस्थेची जबाबदारी राहील याची नोंद घ्यावी.

६).सदर विदयार्थी हा महाराष्ट्रातील अधिनिवासी पाहिजे सदरची योजना ही फक्त महाराष्ट्र राज्यातील विदयार्थ्याकरिताच लागू आहे.त्यामुळे इतर राज्यातील विदयार्थ्याचे अर्ज सादर करण्यात येवू नये.

५).या कार्यालयाकडून मंजूर करण्यात आलेल्या गुणवत्ता यादीची छांयाकित प्रत (शैक्षणिक वर्ष २००६-०७,२००७-०८ व २००८-०९ व २००९-१०)सदर यादयामध्ये ज्या खुल्या संवर्गातील विदयार्थ्यांना सदर सवलत मंजूर करावयाची आहे त्यांचे नावाखाली ठळक अधोरेखाकिंत करावे.

६).**शिक्षण शुल्क समितीने शैक्षणिक वर्ष २०१०-११ करिता निश्चीत केलेल्या शैक्षणिक शुल्कांच्या पत्राची छांयाकित प्रत. प्रस्तावासोबत प्रत्येक संस्थेने जोडावी. आणि फक्त शिक्षणशुल्क(TutionFee) च्या ५० टक्के रक्कमेचे प्रस्ताव सादर करावे.विकास शुल्क (Development Fee) शिक्षणशुल्क समितीने निश्चीत केलेल्या शुल्कामधून वगळण्यात येवून फक्त शिक्षणशुल्क(TutionFee) च्या ५० टक्के रक्कमेचे प्रस्ताव सादर करावे याची नोंद घ्यावी.**

७).**ज्या संस्थानी मागील ईबीसीमधील विकास शुल्क (Development Fee) ची वसुली करुन अदयापपर्यत या कार्यालयास सादर केलेली नाही अशा संस्थाचे प्रस्ताव स्विकारले जाणार नाही व त्यांची तरतूद संचालनालयाकडे केली जाणार नाही याची नोंद घ्यावी.सदर वसुली तात्काळ करुन या कार्यालयाच्या** नावे धनाकर्ष काढून जमा करावेत.

८) विदयार्थ्यांना कोणत्याही एकाचप्रकारची शिक्षणशुल्क सवलत देय असते याची नोंद संस्थाप्रमुखानी विदयार्थ्याचे अर्ज भरुन घेताना काळजी घ्यावी. (Minority Scholarship)व इतर कोणत्याप्रकारची स्कालरशिप घेत असल्यास सदर विदयार्थ्याचे ईबीसीचे अर्ज घेवू नये.या बाबतची सर्वस्वी जबाबदारी संस्थाप्रमुखाची राहील याचीही नोंद घ्यावी.

९) विदयार्थ्याची यादी तयार करतांना विदयार्थ्याचे नाव अभ्यासक्रम व शिकतअसलेले वर्ष (वर्ग),शिक्षणशुल्क समितीने निश्चीत केलेली शिक्षणशुल्क फी,व शेवटचा रकाना शिक्षण शुल्काच्या ५० टक्के देय असलेली रक्कम अशाप्रकारे यादया वर्षनिहाय म्हणजेच प्रथमवर्ष,द्वितीयवर्ष,तृतीयवर्ष व चतुर्थवर्ष याप्रमाणे तयार करुन त्यांची एकूण रक्कम शेवटी घ्यावी.सदर रक्कम सोबत जोडलेल्या विवरणपत्राप्रमाणे जुळली पाहिजे.

येथे असेही निर्देशित करण्यात येते की,आपल्या संस्थेत शैक्षणिक वर्ष २०१०-११ या वर्षामध्ये आर्थिकदृष्टया मागासवर्गीय विदयार्थी उपलब्ध नसल्यास ,आपल्या संस्थेत एकही आर्थिकदृष्टया मागासवर्गीय विदयार्थी उपलब्ध नसल्याबाबतचे प्राचार्याचे हमीपत्र रु.२०/- च्या बॉडपेपरवर उपरोक्त नमूद केलेल्या दिंनाकापूर्वी पाठविण्यात यावे

तसेच आपल्या संस्थेमधील सदर योजनेमध्ये पात्र असलेले विदयार्थी सदर योजनेपासून वंचित राहणार नाहीत याची काळजी संस्थास्तरावरुन घेण्यात यावी. व चुकीचे प्रस्ताव सादर करण्यात येवू नये याबाबत विभागीय कार्यालयास/संचालनालयास तक्रारी प्राप्त झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संस्थाप्रमुख या नात्याने आपली राहील याची नोंद घ्यावी.

**सहपत्र:**-विहीत नमुन्यातील अर्ज व प्रपत्रे

**(दि.रा.नंदनवार)**
**सहसंचालक**
**तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नाशिक.**

खाजगी विना अनुदानित व कायम विना अनुदानित शिक्षण संस्थांमधील व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेणा-या आर्थिकदृष्ट्या मागास प्रविष्ट विद्यार्थ्यांना शैक्षणिक शुल्काची प्रतिपूर्ती करण्याबाबत संस्थाप्रमुखांनी सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, यांना द्यावयाचे माहितीचे विवरणपत्र

संस्थाप्रमुखांचे पदनाम
व संस्थेचे नांव :-

| अ.क्र. | अभ्यासक्रम | आर्थिक वर्ष २०१०-११ | | | | | | | | एकूण | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | प्रथम वर्ष | | द्वितीय वर्ष | | तृतीय वर्ष | | चतुर्थ वर्ष | | | |
| | | आर्थिकदृष्टया मागासवर्गीय लाभार्थी विद्यार्थी संख्या | प्रतिपूर्ती करावयाचे ५०% शिक्षण शुल्क | आर्थिकदृष्टया मागासवर्गीय लाभार्थी विद्यार्थी संख्या | प्रतिपूर्ती करावयाचे ५०% शिक्षण शुल्क | आर्थिकदृष्टया मागासवर्गीय लाभार्थी विद्यार्थी संख्या | प्रतिपूर्ती करावयाचे ५०% शिक्षण शुल्क | आर्थिकदृष्टया मागासवर्गीय लाभार्थी विद्यार्थी संख्या | प्रतिपूर्ती करावयाचे ५०% शिक्षण शुल्क | (रकाना ३ + ५ + ७ + ९) | (रकाना ४ + ६ + ८ + १०) |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ |
| अ) | पदविका | | | | | | | | | | |
| १ | अभियांत्रिकी | | | | | | | | | | |
| २ | औषधनिर्माणशास्त्र | | | | | | | | | | |
| ३ | हॉटेल मॅनेजमेंट ॲण्ड कॅटरींग टेक्नॉलॉजी | | | | | | | | | | |
| | एकूण (अ) | | | | | | | | | | |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ब) | पदवी | | | | | | | | | | |
| १ | अभियांत्रिकी | | | | | | | | | | |
| २ | औषधनिर्माणशास्त्र | | | | | | | | | | |
| ३ | वास्तुशास्त्र | | | | | | | | | | |
| ४ | हॉटेल मॅनेजमेंट ॲण्ड कॅटरींग टेक्नॉलॉजी | | | | | | | | | | |
| | **एकूण (ब)** | | | | | | | | | | |
| क) | **पदव्युत्तर पदवी** | | | | | | | | | | |
| १ | एमबीए/एमएमएस | | | | | | | | | | |
| २ | एमसीए | | | | | | | | | | |
| | **एकूण (क)** | | | | | | | | | | |
| | **एकूण स्थूल रक्कम ( अ + ब + क )** | | | | | | | | | | |

टिप - १) उपरोक्त विवरणपत्रातील रकान्यांच्या अनुषंगाने संबंधित पदवी / पदविका / पदव्युत्तर पदवी अशा अभ्यासक्रमाच्या कालावधीनिहाय (Duration of Courses) नुसार माहिती दयावी. **सदर माहिती देताना वास्तुशास्त्र अभ्यासक्रम हा ५ वर्षाचा असलेल्या पाचव्या वर्षातील ईबीसी लाभार्थी विद्यार्थ्यांची माहिती देण्यात यावी.**

२) प्रत्यक्ष ईबीसी लाभार्थी विद्यार्थ्यांची संस्था व अभ्यासक्रमनिहाय यादी जोडावी.

संस्थेचे नांव : -

( संस्थेच्या कार्यालयाने भरावयाची माहीती )

विद्यार्थ्याचा अपत्य क्रमांक : --------- ------ प्रथम प्रवेशाचे वर्ष ---------------- अभ्यास क्रमाचे नांव ---------

गुणवत्ता यादीतील अनु क्रमांक ----------------- चालु वर्षाचे शैक्षणिक अभ्यासक्रमाचे नांव -----------------

इयत्ता --------- प्रवेशाचा पावती क्रमांक --------------

---

खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित शिक्षण संस्थांमधील व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या आर्थिकदृष्टया मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्काच्या प्रतिपुर्तीबाबत

( अर्जाचा नमुना हा विद्यार्थ्याच्या आई- वडिलांनी / पालकांनी भरुन दोन संस्थंत प्रतीत सादर करावा )

लागु नसेल ते खोडावे

प्रति ,
प्राचार्य /संचालक
------------------------------
------------------------------

विषय : - आर्थिक दृष्टया मागासलेल्य विद्यार्थ्यांना अनुज्ञेय असणारी फी माफी मिळण्यसाठी अर्ज

महोदय/महोदया,

वरील योजनेस लागु असलेले नियम मी वाचलेले आहें व ते मला मान्य आहेत मी अशी विनंती करतो /करते की, माझा मुलगा/मुलगी /पाल्य यास /हिस वरील योजनेनुसार -------------- या चालु वर्षात शुल्क माफीची सवलत देण्यत यावी त्या संबंधीचा तपशिल खालील प्रमाणे

१ मुलाचे/पाल्याचे नांव ----------------------------------------

२ पित्याचे /आईचे/ पालकाचे संपुर्ण नांव व हल्लीचा पत्ता ----------------------------------------
----------------------------------------

३ पित्याचे /आईचे /पालकाचे मुळचे राहण्याचे ठिकाण व गांव -------------------- जिल्हा --------------------

४ मुळच्या राहण्याच्या ठिकाणची लोकसख्या १०,००० पर्यंत किंवा १०००० चे वर आहे काय ? ----------------

५ मागील वर्षी विद्यार्थ्याचे /विद्यार्थीनीचे जेथे नाव दाखल होते ----------------------------------------
त्या संस्थेचे नांव व पत्ता ----------------------------------------

६ चालु वर्षी जेथे नांव दाखल केले आहे त्या शैक्षणिक संस्थेचे नांव ----------------------------------------
इयत्ता व तुकडी इयत्ता -------------- तुकडी --------------------

७ मागील वार्षिक परिक्षेत वरच्या वर्गात पाठविला / उत्तीर्ण झाला उत्तीर्ण झाला / त्याच वर्गात ठेवण्यात आला अगर त्याच वर्गात ठेवण्यात आला /आली

८ अ ) चालु वर्षी अन्य शैक्षणिक संस्थेत नाव दांखल केले आहे काय ? होय/ नाही
ब ) असे असल्यास त्या शैक्षणिक संस्थेचे नांव व इयता वर्ग ----------------------------------------
क) अशा शिक्षण संस्थेत फी माफी साठी अर्ज केला आहे काय? होय/ नाही

९ अ ) हया शिवाय इतर शैक्षणिक सवलतीसाठी या वर्षी वरील वर्गा करीता अर्ज केला आहे काय ----------------------------------------
ब ) असल्यास तपशील द्यावा ----------------------------------------

www.scantopdf.eu

१० हयात असल्यास आई वडिलांच्या किंवा हयात नसल्यास पालकांच्या मालमत्ते संबंधी अधिक माहीती

१ ) वेतन (सर्व भत्ते धरुन ) ---------

२ ) धारण केलेल्या जमिनीचे अथवा जमिनीच्या हिश्शाचे क्षेत्र ---------

३ ) वार्षिक जमीन महसूल आकारणी ---------

४ ) अ ) इतर स्थावर मालमत्ता ---------

ब ) घर /अगर अशा मालमत्तेपासून मिळत असलेले वार्षिक उत्पन्न ---------

५) दुकाने अगर इतर बाबीपासून मिळणारे उत्पन्न मार्ग ---------

उत्पन्न ---------

## ईबीसी सवलती साठी उत्पन्नासबंधीचे निवेदन

**अ ) अर्जदार हा विद्यार्थ्यांच्या आई वडिलापैकी असेल तर**

मी प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतोकी, माझे / माझ्या पत्नीचे व मुलाचे तसेच अविभक्त कुटुंबातील हिश्शासह सर्व मार्गांनी मिळालेले निव्वळ उत्पन्न -----या वर्षात रु ----------इतके होते. हे वार्षिक उत्पन्न रु १,००,०००/- पेक्षा अधिक नसल्यामुळे माझा मुलगा/मुलगी चालु शैक्षणिक वर्षात फी माफी मिळण्यासाठी पात्र आहेत.

**ब ) अर्जदार पालक असल्यास**

मी प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतोकी, माझ्या पाल्याचे व त्याच्या आई वडिलांचे भावाचे बहीणीचे अविभक्त कुटुंबातील हिस्सा व त्यांच्या पालन पोषनासाठी व शिक्षणासाठी जबाबदार असलेल्या व्यक्तीचे सर्व मार्गांनी मिळालेले उत्पन्न ------------------ या वर्षात रुपये ------------ इतके होते. हे उत्पन्न रुपये १,००,०००/- पेक्षा अधिक होत नसल्यामुळे चालु वर्षात फी माफी हमिळण्यास मी पात्र आहे

**क) अर्जदार विद्यार्थी असेल तर भरावयाचा मजकूर**

मी प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतोकी, माझे/ माझ्या भावाचे /बहिणीचे माझ्या आई वडिलांचे माझ्या पालनपोषणासाठी व शिक्षणासाठी जबाबदार असलेल्या व्यक्तीचे सर्व मार्गांनी मिळालेले उत्पन्न ---------------------या वर्षात रुपये ------------------ इतके होते हे उत्पन्न रूपये १,००,०००/- पेक्षा जास्त नाही

मी ------------------------------विद्यार्थ्याचा पिता/माता/पालक जाहिर करतो की, वर प्रस्तुत केलेली माहिती माझ्या संपुर्ण माहितीप्रमाणे सत्य आहे आणि वर नमूद केल्यापैकी कोणतीही माहिती चुकीची अथवा दिशाभुल करणारी असल्यास माझा मुलगा/मुलगी/पाल्य ही खटला भरण्यास , शैक्षणिक संस्थेतून काढून टाकण्यास पात्र ठरेल हे मला ठाऊक आहे

मी माझा मुलगा/मुलगी/पाल्य ज्या संस्थेत फी आकारण्यात येते अशा कोणत्याही खाजगी शिकवणी वर्गात नाव दाखल केलेले नाही. या वर्षभरात जर मी त्याने/तिने मी माफी आकारण्यात येणा-या कोणत्याही शिकवणी वर्गात नाव दाखल केले तर मी फी माफीच्या सवलतीस अपात्र ठरेन याची मला जाणीव आहे आणि तसे घडल्यास शैक्षणिक संस्थेला कळविण्याची हमी देतो.

मी फी माफीच्या सवलतीसाठी शासनाने निश्चित केलेल्या मर्यादेपेक्षा निव्वळ उत्पन्न अधिक असल्याचे शासनास आढळुन आल्यास प्रतिज्ञेच्या आधारावर फी माफीच्या रुपाने माझ्या मुलास /मुलीस/मला जी रक्कम मिळाली असेल किंवा मिळेल त्याच्या दुप्पट परत करण्याची हमी देतो अशी कबुली देतो की , सदर रक्कमेची मागणी करण्यात आल्यास परत करण्याबाबत माझा कसूर झाल्यास शासनाने ती माझेकडून किंवा माझा वारस यांजकडून किंवा मालमत्तेमधून ,जमीन वसूलीची थकबाकी म्हणून वसुल करावी तसेच खोटे प्रतिपादन केल्यास माझा मुलगा/मुलगी/पाल्य /मी स्वतः शाळेतून काढून टाकण्यास पात्र ठरेन या गोष्टीची मला जाणीव आहे

दिनाक :

स्थळ :

सही ।/अंगठा

वडिल/आई/पालक/ विद्यार्थी

www.scantopdf.eu

## विद्यार्थ्यांचे निवेदन

मजकूर मी वाचलेला असून तो माझ्या माहीतीप्रमाणे खरा आहे. उपरनिर्दिष्ट फी माफी योजने संबधीच्या नियमांचे पालन करीन अशी मी कबुली देतो

दिनांक :

ठिकाण :

विद्यार्थ्याची सही

---

# कुटुंब मर्यादा प्रमाणपत्र

मी विद्यार्थी ------------------------------------------------------------------
चा वडील /पालक श्री ------------------------------------------------------------राहणार ----------
------------ ता ------------------ जि -----------------------------------शाळा /महाविद्यालय ---------------
--------------------- असे प्रतिज्ञापुर्वक लिहुन देतो की, **मी महाराष्ट्र राज्याचा १५ किंवा त्यापेक्षा अधिक वर्षे रहिवासी आहे माझे कुटुंब मर्यादा खालील प्रमाणे असुन सदरील तपशील सत्य असल्याबाबत मी स्वाक्षरी केली आहे**

| अ. क्र | कुटुंबातील सर्व व्यक्तीचे नांवे हयात विवाहीत अविहीत मुले/मुलींची नावे नमुद करावे | जन्म तारीख | विवाहीत / अविवाहीत | इयत्ता | पालकांशी नाते | शैक्षणिक सवलतीसाठी अर्ज केला असल्यास संस्थेचे नांव व पत्ता |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |

विद्यार्थ्याची सही

पालकाची सही

दाखला देण्यात येतो की , अर्जात विद्यार्थ्याने व त्याच्या पालकाने दिलेली वरील माहीती तपासली असुन ती सत्य असल्याबद्दल खात्री आहे. शाळेच्या रेकार्डशी तपासली आहे व ती योग्य आहे व संबंधीत विद्यार्थी या योजनेच्या सर्व अटि व शर्ती विशेषतः सरासरी हजेरी व चांगली वर्तणुक पुर्ण करीत असल्याने ही फी माफी सवलत मंजूर करावी अशी मी शिफारस करतो.

सही

मुख्याध्यापक / प्राचार्य

शिक्का

www.scantopdf.eu

# अपत्य प्रमाण पत्र

प्रमाणित करण्यात येते की , श्री / श्रीमती ------------------------------------------------
रा ----------------------------- ता ------------------- जि ------------------- येथील रहवासी असुन महाराष्ट्र राज्याचा **१५ किंवा त्यापेक्षा अधिक वर्षे रहिवासी** आहे. माझा मुलगा/मुलगी कु ------------------------------------
वर्ग --------------- तुकडी --------------शाळा/ महाविद्यालय ---------------------------------------------- शिकत असून त्याचे साठी फी माफीचा अर्ज भरला आहे त्या बाबत असे निवेदन करतो की , मला दि १५/८/१९६८ पुर्वीचे एकुण ------------ अपत्य आहेत व दि १५/८/१९६८ नंतरचे एकुण ---------- अपत्य आहे. हा मुलगा /मुलगी मला हयात असलेल्या विहाहीत /अविवाहीत अपत्यामधील **पहिल्या तीन अपत्या पैकी आहे**. त्याचा अपत्य क्रमांक ------- आहे. हे खोटे निदर्शनास आल्यास आल्यास मी दुप्पट फी भरण्यास तयार आहे वर दर्शविलेली माहिती खोटी किंवा शासनाची दिशाभूल करणारी आढळल्यास त्यामुळे होणारी कार्यवाही मला बंधनकारक राहील याची मला जाणिव आहे. **तसेच दोन पेक्षा जास्त अपत्यासाठी शैक्षणिक सवलतीची मागणी केलेली नाही.**

दि----------------
स्थळ

पालकाची स्वाक्षरी

सरपंच/विशेष कार्य अधिकारी/
राजपत्रीत अधिकारी
स्वाक्षरी व शिक्का

---

# रहिवाशी प्रमाण पत्र

प्रमाणपत्र देण्यात येते की, श्री ------------------------------------------------
रा ------------------ ता ----------------- जि ------------------------------------------
हे येथे जन्मापासून /सन --------- वर्षापासून एकुण --------- वर्षे रहिवाशी आहेत. म्हणून त्यांना हे सबब प्रमाणपत्र देण्यात येत आहे

प्रमाण पत्र देणा-याची सही ------------------
व शिक्का

दिनांक
स्थळ

तहसीलदार / उपजिल्हाधिकारी
सरपंच/विशेष कार्य अधिकारी
राजपत्रीत अधिकारी

---

सोबत कागदपत्रे जोडावेत

१. तहसीलदार यांनी प्रमाणित केलेला मागील आर्थिक वर्षाचा उत्पन्नचा मुळ दाखला
२ शाळा /महाविद्यालय सोडल्याचा दाखला साक्षांकीत प्रत
३. एसएससी/एचएससी/स्नातक पदवी/ मागील वर्षी परीक्षा उत्तीर्ण गुणपत्रीका साक्षांकीत प्रत
४. रेशन कार्ड साक्षांकीत प्रत असल्यास
५. चालु शैक्षणिक वर्षास प्रवेश घेतल्याची फी पावती साक्षांकीत प्रत
६. अधिवास प्रमाणपत्र (डोमीसाईल सर्टिफीकेट ) उपलब्ध असल्यास
७. गॅप असल्यास गॅप ॲफीडेव्हीट
८. मागील वर्षी आर्थिकदृष्टया मागास सवलत उपभोगली आहे त्याचे शाळा / महाविद्यालयाचे प्रमाणपत्र

www.scantopdf.eu

**खाजगी विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित शिक्षण संस्थांमधील व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या आर्थिकदृष्टया मागासवर्गीय विदयार्थ्यांच्या शैक्षणिक शुल्काच्या ५०टक्के प्रतिपूर्तीबाबत**

**सोबत सादर करावयाची कागदपत्रे व इतर माहीती व चेक लीस्ट**

१ संस्थेस या कार्यालयाने प्रमाणित केलेली कॅप ॲडमीशन लिस्ट साक्षांकीत प्रत प्रथम वर्ष /थेट द्वितीय वर्ष प्रवेशसाठी

२ विद्यार्थ्याने परिपूर्ण भरलेला अर्ज ( उदा संपूर्ण नांव व सद्याचा पता , मुळगांव, अपत्याबाबत माहीती , ऊत्पन्न , कुटुंब तपशिल इत्यादि तपासावे )

३. तहसीलदार यांनी प्रमाणित केलेला मागील आर्थिक वर्षाचा उत्पन्नचा मुळ दाखला

४. एसएससी/एचएससी/स्नातक पदवी/ मागील वर्षी परीक्षा उत्तीर्ण /एटीकेटी गुणपत्रीका साक्षांकीत प्रत

५ चालु शैक्षणिक वर्षास प्रवेश घेऊन शिक्षण शुल्क फी भरल्याची पावती साक्षांकीत प्रत

६ विद्यार्थी चौथे अपत्य नसावे याबाबतचा पुरावा रेशनकार्डची साक्षांकित प्रत ( असल्यास )

७ डिप्लोमासाठी विद्यार्थीने ११ वी १२ वी नंतर प्रवेश घेतला असेल तर संबंधीत महाविद्यालयाचे विद्यार्थ्यास कोणतीही शिष्यवत्ती अथवा सवलतीचा लाभ घेतला नाही प्रमाणपत्र घ्यावे (सदर वर्षात लाभ घेतलेल्या विद्यार्थ्यांना सवलत मंजूर करण्याची तरतूद नाही )

८ गॅप असल्यास गॅप ॲफिडेव्हीट जोडावे

९ शिक्षण शुल्क समितीने शुल्क निश्चित केलेले आदेशाची साक्षांकीत प्रत (मागणी केलेल्या वर्षनिहाय )

१० अधिवास प्रमाणपत्र (डोमीसाईल सर्टिफिकेट ) उपलब्ध असल्यास

www.scantopdf.eu